# नवगंध

केशरांच्या मुक्त लतिका, काजळाच्या अव्यक्त रेखा
ओंजळींनी कैद करता, हलकेच दिसती हासता    ॥ १ ॥

संग त्यांना पाकळ्यांचा, गंध बिलगे ओळखीचा
मागता गंध सोयरीक, शब्द मागती सोबतीचा    ॥ २ ॥

उधळूनी दिस थांबला, चंद्र भावनेत गुंतला
वेध लागले केसरासं, आवेश गगन भारण्या   ॥ ३ ॥

तो चंद्रही मग लोपला, पूर्वस केशर रंगला
विरला सुवास कालचा, नवगंध येथ अंकुरला    ॥ ४ ॥

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78